Publication : Nav Rashtra
Dated : 10.07.2020
Page: 3

### अदाणी इलेक्ट्रिसिटीने जाहीर केली

# व्याजमुक्त ईएमआय सुविधा

**मुंबई :** अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडने आपल्या सर्व ग्राहकांना सध्या भेडसावणाऱ्या बिलाबद्दलच्या चिंता दूर करण्यासाठी सुलभ भरण्याचे पर्याय देऊ केले आहेत. एमईआरसीच्या समर्थ मार्गदर्शनाखाली एईएमएल सुलभ भरणा पर्यायांसाठी कमाल लाभ पुरवण्याच्या उद्देशाने आवश्यक ते सर्व उपाय करत आहे.

एईएमएलचे ग्राहक आता त्यांचे बिले तीन व्याजमुक्त हप्त्यांमध्ये भरू शकतात; मुदतीच्या तारखेपूर्वी बिलाचा हप्ता भरणाऱ्या ग्राहकांना ही सुविधा उपलब्ध करून घेता येईल.

## व्याजमुक्त हप्त्यांमध्ये भरू शकतात बिल

एमईआरसीच्या सूचनांनुसार, ज्या ग्राहकांना सरासरी वीजबिल रकमेच्या दुपटीहून अधिक बिल आले आहे, ते ईएमआय सुविधा उपलब्ध करून घेऊ शकतात. एईएमएलचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कंदर्प पटेल याबद्दल म्हणाले, "आमच्या मौल्यवान ग्राहकांना सध्याच्या साथीच्या काळात मदत करण्याच्या एक भाग म्हणून, मुदतीच्या आत बिले भरणाऱ्या सर्व ग्राहकांसाठी व्याजमुक्त हप्त्यांची सुविधा जाहीर करताना आम्हाला आनंद होत आहे. सध्याची परिस्थिती हाताळण्यामध्ये वितरण कंपन्यांना सक्रिय मार्गदर्शन केल्याबद्दल आम्ही एमईआरसीचे आभारी आहोत. एमईआरसीने ०१.०४.२०२० पासून वीजदरात सुमारे १८ टक्के कपात लागू केल्यामुळे ग्राहकांना खूप मोठा दिलासा मिळाला आहे.